औरंगाबाद गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शनिवार दि. २९. १०. ९४ रोजी झालेल्या ९५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१. मा. श्री. कैलास पाटील	सभापती, औरंगाबाद मंडळ
२. श्री. प्रकाश मुगदीया	उपसभापती औरंगाबाद मंडळ
३. श्री. पिंगळे अप्पर आयुक्त, आयुक्त औरंगाबाद यांचे	सदस्य प्रतिनिधी
४. श्री. के. डिसूज, उपसंचालक, नगररचना औरंगाबाद विभाग	सदस्य औरंगाबाद मंडळ
५. श्री. विनायक गायके	_"_
६. श्रीमती पार्वतीबाई शिरसाठ	_"_
७. श्री. रामकृष्ण बोबडे	_"_
८. श्री. चंद्रप्रकाश शर्मा	_"_
९. श्री. प्रल्हाद चापके	_"_
१०. श्री. भास्कर मुंढे मुख्य अधिकारी/औ. मं.	_"_
११. श्री. विश्वनाथ थोरे	_"_
१२. श्री. मतीन काद्री, उपअभियंता, आयुक्त म. न. पा. औरंगाबाद यांचे	सदस्य प्रतिनिधी.

विषय क्रमांक:१: दिनांक २६. ८. ९४ रोजी झालेल्या ९४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

.....x.......

मुख्य अधिकारी यांनी मागील बैठकीचा कार्यवृत्तांत वाचुन दाखविला. त्यावर उपसभापती यांनी सेलु येथील जमिन खरेदी करण्याचा निर्णय मागील बैठकीचा झाला होता त्याचे काय झाले असा प्रश्न उपस्थित केला.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, मागील बैठकीमध्ये सेलु येथील स. न. १४ ही जमिन गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी खरेदी करावी असा निर्णय झाला होता. तो निर्णय आजच्या बैठकीत कायम झाल्यानंतर खरेदीची कार्यवाही पार पाडली जाईल. तथापी प्रस्तावित जमिनीमध्ये काही भागावर शाळेसाठी आरक्षण दाखविले आहे. याबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांचेशी विचारविनिमय करून सदर जमिन खरेदी केली जाईल.

उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांनी सांगितले की, शाळेसाठी जर आरक्षण असेल तर प्राधिकरणाने आरक्षणासहीत जमिन खरेदी करून जमिन विकसीत करावी व ज्या जागेवर आरक्षण आहे ती जागा प्रचलित नियमाप्रमाणे येणारी किंमत देऊन एखाद्या संस्थेला विकता येईल जेणे करून प्राधिकरणाचे नुकसान होणार नाही,

या विषयावर चर्चा करतांना श्री. विश्वनाथ थोरे सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी असा मुद्दा मांडला की, स. क्र. १४ या जमिनीशिवाय दुसरी चांगली जमिन सेलु शहरात मिळू शकते. ही जमिन केवळ नगराध्यक्षांनी सुचविली म्हणून प्राधिकरणाने घेणे संयुक्तीक होणार नाही.

या जमिनीपेक्षा कदाचीत कमी किंमतीत जास्त चांगली जमिन सेलु नगरपरिषदेच्या हद्दीत मिळू शकेल त्याची शक्यता अजमावून पहावी.

यावर मुख्याधिकारी यांनी सांगितले की, नगराध्यक्षांनी सुचविले म्हणून ही जमिन घेत आहोत असा तला प्रकार नाही. ही जमिन गृहनिर्माणासाठी योग्य आहे. याबाबत कार्यकारी अभियंता व मंडळाचे त्यावेळचे सभापती यांनी जमिन पाहिली आहे. गृहनिर्माणासाठी योग्य असल्याची खात्री करुनच जमिन प्रस्तावित करण्यांत आली होती. सध्या परिस्थितीत स.क्र. १४ या जमिनीच्या प्रस्तावास प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे ही जमिन खारेदी करणे अडचणीचे होणार नाही. या जमिनीच्या व्यतिरिक्त दुसरी जमिन खारेदी करावयाची असल्यास पुन्हा म्हाडा कायदा कलम ५२ अंतर्गत सर्व कार्यपध्दतीचे पालन करावे लागेल व पुन्हा नविन प्रस्ताव प्राधिकरणास मान्यतेसाठी पाठवावा लागेल. ती मान्य होण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या अनुषंगाने चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. चापके यांनी प्रतिपादन केले की, जमिन घेता त्याठिकाणी लोकांची मागणी येईल किंवा नाही हे पाहणी अत्यंत जरुरीचे आहे. प्रथम मागणी अंदाज नोंदवावा व नंतर निर्णय घ्यावा असे मत प्रदर्शित केले.

मा. सभापती, उपसभापती यांनी सूचना केली की, श्री. थोरे व श्री. चापके हे त्या परिसरातील सदस्य आहेत त्यांनी नगराध्यक्ष सेलू व स्थानिक जनतेशी चर्चा करुन गृहनिर्माण योजनेच्या दृष्टीने योग्य असेल अशी जमिन निवडण्याचे काम करावे. हे करित असतांना सहाय्यक संचालक नगररचना परभणी यांचा प्रथम सल्ला घ्यावा व नंतर जमिन मंडळाने खारेदी करावी त्यांचा अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीसमोर ठेवावा..

[२] मंडळाच्या ९४ व्या बैठकीत लासूर स्टेशन, पुर्णा, फुलंब्री, हिंगोली इत्यादी ठिकाणी योजना घ्याव्यात अशा सुचना केल्या गेल्या होत्या. त्या दृष्टीने काय कार्यवाही केली याची माहिती उपसभापतींनी विचारली.

त्यावर मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, वरील ठिकाणी जावुन जागेची पाहणी करण्याचे दृष्टीने कार्यकारी अभियंता यांना कळविण्यांत आले आहे. उपसभापतींनी, कार्यकारी अभियंता यांना सांगितले की, या ठिकाणच्या योजना घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक ठिकाणी एका उपअभियंत्यास पाठवावे व जेणे करुन १० दिवसात अहवाल सादर केला जाईल हे पहावे. त्या त्या ठिकाणी मंडळाचे अधिकारी जमिन पाहाण्यासाठी जातील त्या त्या ठिकाणी मंडळाच्या सदस्यांचे सहकार्य घ्यावे.

म. उपसभापतींनी बैठकीत सांगितले की, जालना येथील विडी कामगार वसाहतीचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे एक बैठक आयोजित करण्यांत यावी. सदर बैठकीस मा. सभापती, उपसभापती व जालना येथील सदस्यांना आमंत्रीत करण्यात यावे.

जालना येथे जी विडी कामगारांची वसाहत बांधली आहे. त्या वसाहतीस पाणीपुरवठा, रस्ते व विद्युतीकरण या सुविधा विनामुल्य पुरविण्याचे त्यावेळी नगरपालिकेने ठरावाद्वारे मान्य केले होते. तथापी नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे नगरपरिषदेने या बाह्यसुविधा पुरविल्या नाही. न.प. कडे बरेच प्रयत्न केले. परंतु निधी उपलब्ध नसल्यामुळे ही कामे करु शकत नाही असे उत्तर मंडळास वेळोवेळी मिळते असे मुख्याधिकारी यांनी मंडळास सांगितले. या वसाहतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी [illegible] अभियांत्रिकी

विभागाकडे विचारणा केली असता त्यासाठी २३ लाख रुपये खर्च येणार आहे. असे परिसर अभियांत्रिकी विभागाने कळविले आहे. या खर्चापैकी काही वाटा न.प. ने उचलावा याबाबत जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातुन वरील बैठकीच्या वेळी प्रयत्न करावे असे सर्वानुमते ठरले. मा. सभापती, उपसभापती यांच्याशी विचारविनिमय करून बैठकीची तारीख ठरविण्यात यावी. शक्यतोवर १६/११/९४ रोजी बैठक घ्यावी असे सर्वानुमते ठरले.

[३] पैठण येथील पुरग्रस्तांच्या गृहनिर्माण योजनेबाबत उपसभापती श्री. प्रकाश मुगदीया यांनी विचारणा केली.

त्यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, पैठण येथील योजना मंजूर आहे. जमिनीचा प्रत्यक्ष ताबा मंडळाला मिळालेला आहे. अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालु आहे. जिल्हा निरीक्षक भूमिअभिलेख यांच्याबरोबर संयुक्त मोजणी करून लेआऊट मंजूर करून घ्यावा लागेल. संयुक्त मोजणी लवकर व्हावी या दृष्टीने सूचना देण्याविषयी मा. उपसभापतींनी अप्पर आयुक्तांना सांगितले.

यावर जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालय तालुकास्तरावर आहे. त्यांचेकडुन मोजणी करून देण्याचे दृष्टीने काही अडचण येणार नाही असे अप्पर आयुक्तांनी सांगितले.

मा. उपसभापतींनी सांगितले की, पैठण येथील पुरग्रस्तांच्या गृहनिर्माण योजनेच्या अनुषंगाने कामे त्वरीत पुर्ण करण्यात यावे व अहवाल मंडळास सादर करावा.

मंडळाच्या दि. २६.८.९४ रोजीच्या ९४ व्या बैठकीच्या पुर्ण कार्यवृत्तांचे वाचन होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७०

दिनांक २६.८.९४ च्या ९४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताचे वाचून, सेलु येथील जमिन खरेदीचा निर्णय वरील प्रमाणे बदल करून कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २: ६२४ भूखंड सिरसवाडीरोड जालना या योजनेतील भूखंड बदलुन देणेबाबत.

या विषयावर तयार करण्यात आलेली बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. सिरसवाडी रोड जालना येथे ६२४ भूखंडाची योजना राबविली आहे. योजनेसाठी तीन वेळा जाहिरात देऊनही अल्प प्रतिसाद आल्यामुळे जवळ जवळ १०० भूखंड रिकामे आहे. ज्या अर्जदारांना भूखंड मिळाले आहे. त्यापैकी ६ अर्जदारांनी भूखंड बदलुन देण्यासाठी मंडळाकडे अर्ज केलेले आहे. त्यांना मिळालेले भूखंड हे खड्ड्यात व पाणथळ जागी असल्यामुळे रिकाम्या भूखंडापैकी एक भूखंड मिळावा अशी ६ अर्जदारांनी मागणी केली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास विनियम १९८१ मधील विनियम ८१ नुसार फी घेऊन गाळे बदलुन देण्याची तरतुद आहे. परंतु भूखंड बदलुन देण्याची तरतुद विनियमात नाही.

जर ६ अर्जदारांना भूखंड बदलुन दिले नाही तर ते भरलेले पैसे परत मागतील अशी शक्यता आहे. त्यामुळे रिक्त भूखंडाची संख्या वाढवुन परिणामी प्राधिकरणाचे पैसे अडकुन पडतील. रिक्त असलेल्या भूखंडाची परत जाहिरात काढुन विकावे लागतील त्यामुळे उपलब्ध अर्जदारांना त्यांचा मताप्रमाणे भूखंड बदलुन देणे काही गैर दिसत नाही असे मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले, तथापी, नियमात

तरतुद नाही व किती फिस भूखंड बदलुन देण्यासाठी घ्यावी असा विचार करणे अगत्याचे आहे असे मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले.

मंडळाच्या सदस्या श्रीमती शिरसाठ यांनी मुद्दा उपस्थित केला की, हे भूखंड जर बदलुन दिले तर ते भूखंड नंतर कोण घेईल.

त्यावर मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, जसजशी वेळ जाईल तसतशी भूखंडाची मागणी व किंमत वाढत असते असा मागील अनुभव आहे. त्यामुळे हे भूखंड विकले जातील असे वाटते.

या अनुषंगाने चर्चा करतांना अप्पर आयुक्तांनी सांगितले की, रिक्त भूखंड जाहिरात काढून विकावे लागतील त्यामुळे पैसे भरलेल्या अर्जदारांना रिकामे भूखंड बदलुन देण्यात काही गैर नाही.

त्यावर मंडळाच्या सर्व सदस्यांनी सविस्तर चर्चा करून असे मत व्यक्त केले की, वरील प्राप्त परिस्थित भूखंडाच्या किंमतीच्या २% रक्कम बदली फि म्हणून वसुल करून भूखंड बदलुन देण्यास हरकत नाही. तथापी या निर्णयास प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी घेण्यांत यावी.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७१

मंडळाचे आर्थिक हितलक्षात घेऊन अर्जदारांकडून भूखंड बदलण्याची फिस म्हणून भूखंडाच्या किंमतीच्या २% इतकी रक्कम वसुल करून भूखंड बदलुन देण्यांत यावे व सदरची बाब कार्योत्तर मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे पाठवावी.

विषय क्र. ३: २१० गाळे म्हाळजा नांदेड येथील विडी कामगारांचे
गाळे वाटपाबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मुख्य अधिकारी यांनी मंडळास वाचून दाखविली. प्राधिकरणाने या विषयातील प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे असे मंडळाच्या निदर्शनास आणुन दिले.

त्यावर उपसभापती श्री. प्रकाश मुगदीया यांनी सांगितले की, प्राधिकरणाची मान्यता मिळाली असल्यामुळे अर्जदाराच्या इच्छेप्रमाणे सोडत न काढता गाळे वाटप करण्यांत यावे.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७२

म्हाळजा नांदेड येथील विडी कामगारांसाठी बांधलेल्या गाळ्यांना प्रतिसाद नसल्यामुळे सोडत न काढता अर्जदारांस इच्छेनुसार त्यांना हवा असलेला गाळा वाटप करण्यांत यावा.

विषय क्र. ४: साखर कारखान्याचे अधिकारी/कर्मचा-यासाठी
म्हाडातर्फे गृहबांधणी योजना हाती घेणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद मंडळाकडे जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना नळेगांव जि. लातूर व गंगापूर सहकारी साखर कारखाना गंगापूर जि. औरंगाबाद या दोन कारखान्याचे

गृहबांधणी प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेले आहे व ते प्राधिकरणास प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यांत आले आहे. या योजनेसाठी लागणारी जमिन कारखाने मंडळास हस्तांतरीत करण्यास तयार आहे तसेच कर्ज परत फेडीची हमी घेण्यास तयार आहेत. याबाबत प्राधिकरण स्तरावर सर्व बाबींचा विचार विनिमय झाला त्यानुसार अकलुज जि. पुणे येथील सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्याकरिता प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्याचे प्राधिकरणाने ठरविले आहे व या ... योजनेच्या अनुभवानंतर इतर योजना राबविण्याकरिता यथावकाश विचार करण्यांत येईल असे प्राधिकरणाने दि. १५. १०. ९४ च्या पत्रान्वये कळविले आहे. ते पत्र सर्व सदस्यांना अवलोकनार्थ दिले आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

या विषयावर चर्चा करतांना श्रीमती शिरसाठ यांनी व इतर सदस्यांनी प्रतिपादन ~~केले~~ की, ज्याप्रमाणे अकलुज साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्याकरिता प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्याचे ठरले आहे. त्याप्रमाणे मराठवाड्यात एका कारखान्यासाठी प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्याविषयी प्राधिकरणास कळविण्यांत यावे.

श्री. चंद्रप्रकाश शर्मा सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी विचारणा केली की, सहकारी साखर कारखान्याप्रमाणे इतर कारखान्यासाठी म्हाडाची गृहनिर्माण योजना राबविता येईल का ?

त्यावर मुख्याधिकारी यांनी सांगितले की, अशी योजना राबविता येणार नाही. कारण प्राधिकरण सर्वसाधारण लोकांसाठी गृहनिर्माण योजना राबविते. विशिष्ट गटासाठी नाही. या विषयावर सखोल चर्चा करुन असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७३

प्राधिकरणातर्फे अकलुज जि. पुणे येथील सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्याकरिता प्राधिकरण स्तरावर योजना हाती घेण्यांत आली आहे. त्याच धरतीवर मराठवाड्यात एका साखर कारखान्याकरिता योजना हाती घेण्यासाठी प्राधिकरणाकडे शिफारस करण्यांत यावी.

प्राधिकरणाचा दिनांक १५. १०. ९४ च्या पत्रान्वये कळविलेला निर्णय संबंधीत कारखान्यास कळविण्यांत यावा.

विषय क्र. ५: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपुर्ती करणेबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी मुख्य अधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली व चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७४

श्री. एस. ओ. खान शाखा अभियंता यांनी त्यांच्या आईस खाजगी रुग्णालयात अंतररुग्ण म्हणून दाखल केले होते व त्यांचा आजार गंभीर [कर्करोग] होता ही बाब विचारात घेऊन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे रक्कम रु. १०,०००/- अदा करण्यास मंडळाने मंजूरी दिली.

विषय क्र. ६: बीड नगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या झोपडपट्टी सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

मु.अ/औ.सं. यांनी मंडळास माहिती दिली की, बीड न.प. ने बीड शहरातील १] सटवाईमैदान-शाहुनगर-जालनारोड-माळीगल्ली सुभाषरोड व [२] हाडकपुर-भोईवाडा-चांभारवाडा या दोन झोपडपट्ट्याचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मंडळाकडे पाठविले आहे व सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाने मंडळास दिलेल्या अधिकारानुसार देण्यात येते. प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव अनुक्रमे रू. ९,६२,६७४ व ८,९९,९२८ चे आहे. त्यास नियमाप्रमाणे अनुक्रमे रू. ६,५५,९७४ व रू. ७,३१,९७४ ची प्रशासकीय मान्यता देता येते.

बीड शहरासाठी सन १९९४-९५ या आर्थिक वर्षात रू.९.०० लक्षाची आर्थिक तरतुद असुन आजपर्यन्त रू. ७.४५ लक्षाची तरतुद शिल्लक आहे. नगर पालिकेच्या हाती सध्यस्थितीस अंदाजे रू. ४०.०० लक्षाची कामे आहेत. पुढील वर्षाकरिता म्हणजे सन १९९५-९६ करिता बीड शहराच्या झोपडपट्टी सुधारणा कामाकरिता रू. २५.०० लक्षाची तरतुद करण्याप्रस्तव जिल्हा नियोजन व विकास मंडळ बीड यांस शिफारस करण्यात आली आहे. चालु वर्षी व पुढील वर्षाची प्रस्तावित तरतुद खर्च होण्याच्या दृष्टीने व भविष्यात बीड नगरपालिकेच्या हाती कामे असण्याच्या दृष्टीकोणातुन सदर कामांना प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

या विषयावर चर्चा करतांना श्रीमती पार्वतीबाई शिरसाठ सदस्या यांनी विचारणा केली की, सदर योजना इतर ठिकाणी राबविता येते का ?

यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, झोपडपट्टी सुधारणा योजना ही ज्या शहराची लोकसंख्या ५०,००० वर आहे व सदर झोपडपट्ट्या या राजपत्रात स्लम म्हणून जाहीर झाल्या आहेत अशा ठिकाणी झोपडपट्टी सुधार योजना राबविता येते.

मंडळाच्या सदस्यांनी विचारणा केली की, झो.सु. योजनेच्या कामावर मंडळ देखरेख करते का ?

यावर मु.अ. यांनी खुलासा केला की, झो.सु. योजनेच्या कामाचे देयक मंडळाकडे प्राप्त होते. त्यावेळी झालेल्या कामाची पाहणी मंडळाच्या उपअभियंत्यामार्फत करण्यात येते व त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच न.प.स बिलाची अदायगी करण्यात येते.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७५

बीड न.प. कडून प्राप्त झालेल्या १] सटवाईमैदान-शाहुनगर-जालना रोड-माळीगल्ली, सुभाषरोड व [२] हाडकपुरा-भोईवाडा-चांभारवाडा या दोन झोपडपट्टी सुधार योजनेच्या प्रस्तावास अनुक्रमे रू. ६,५५,९७४ व रू. ७,३१,९७४ ची प्रशासकीय मान्यता खालील अटीवर देण्यात येत आहे.

<u>अट:-</u> नगरपालिकेने त्यांच्या हाती असलेल्या जुन्या कामांना प्राथमिकता देऊन त्यांनाच निधीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपुर्ती करण्यात येईल व प्रस्तावित योजनांना अतिरिक्त निधी उपलब्ध झाल्यास तसेच सदर प्रस्तावीत कामांचा खर्च नगरपालिकेने स्वत:च्या निधीतुन केल्यानंतरच प्रतिपुर्ती करण्यात येईल या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र. ७: प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी निर्मिती केंद्र सुरु करणेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, केंद्र शासनाने १९८८ मध्ये राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण जाहीर केले. त्या धोरणानुसार सर्व जिल्ह्यात इमारत निर्मिती केंद्र स्थापन करावयाची आहेत. त्याप्रमाणे मराठवाड्यातील ७ जिल्ह्यात निर्मिती केंद्राचे पंजीकरण करण्यांत आल्याचे मु.अ. यांनी सांगितले. या निर्मिती केंद्राच काम पाहाण्यासाठी प्राधिकरणाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे कनिष्ठ अभियंत्यांची नेमणूक १ वर्षाच्या कालावधीकरिता करण्यांत आली होती. सदर कालावधी संपल्यामुळे भूकंपग्रस्त भागातील २ कनिष्ठ अभियंता वगळता इतरांना कमी करण्यांत आले.

या विषयावरचर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. गायके यांनी निर्मिती केंद्रानी काय काम केले याची माहिती मिळेल का असे विचारले त्यावर मुख्याधिकारी यांनी सांगितले की, निर्मिती केंद्र हे स्थानिक जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली काम करणारी संस्था आहे. काय काम करायचे ते ठरवतात व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे संस्थेचे सचिव आहेत. तथापी त्यांच्या कामाचा प्रगती अहवाल त्यांचेकडुन मागवुन पुढील बैठकीसमोर ठेवला जाईल.

यावर चर्चा करतांना मु.अ. यांनी खुलासा केला की, औरंगाबाद येथील निर्मिती केंद्र कार्यान्वीत आहे. या केंद्रामार्फत आतापर्यन्त ३० लोकांना प्रशिक्षण देण्यांत आले आहे. निर्मिती केंद्र स्थापन करण्यामागे जो उद्देश आहे तो असा की, नविन तंत्र विकसीत करुन, स्वस्त किंमतीमध्ये बांधकाम साहित्य तयार करुन स्थानिक कामगार वर्गास प्रशिक्षण देणे, निर्मिती केंद्रात तयार केलेले बांधकाम साहित्य तसेच इतर स्वस्त बांधकाम साहित्य बाजारामध्ये उपलब्ध करणे, क्षेत्रीय आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन बांधकामाचे निरनिराळे तंत्रज्ञान विकसीत करणे व त्याचा प्रचार करणे.

या अनुषंगाने उपसभापती श्री. प्रकाश मुगदीया यांनी सांगितले की, सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबतची माहिती प्रकल्प संचालकाकडुन मागवुन मंडळाच्या पुढील बैठकीत सदरची माहिती ठेवावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७६

निर्मिती केंद्रासंबंधीची माहिती प्रकल्प संचालकाकडून घेऊन ती मंडळासमोर ठेवावी.

विषय क्र. ८: मंडळाच्या कार्यक्षेत्रातील व ताब्यातील जमिनीबाबत वादातील प्रकरणे, न्याय प्रविष्ट प्रकरणे किती आहेत याबाबत माहिती.

वेगवेगळ्या विषयाची विविध न्यायालयात प्रलंबीत असलेल्या प्रकरणाची यादी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

या विषयावरचर्चा करतांना श्रीमती शिरसाठ यांनी प्रतिपादन केले की, प्रकरणे न्यायालयात जाण्यापुर्वी मंडळाने तडजोड करुन वाद मिटवावा म्हणजे मंडळाचे आर्थिक नुकसान होणार नाही व वेळ वाया जाणार नाही.

यावर मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, ही बाब मंडळातर्फे दाखल करण्यांत येणाऱ्या दाव्याबाबत विचारात घेता येईल परंतु इतरांकडून दाखल होणाऱ्या दाव्यांबाबत कांही करता येईल असे वाटत नाही.

म. सभापती यांनी विचारणा केली की, जे वाद चालु आहे व प्रकरणी न्यायालयात आहे. त्याबाबत लोकांचे काय म्हणणे आहे, याच अनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री. गायके यांनी प्रश्न उपस्थित केला की, श्री. बी. एन. कुलकर्णी यांनी म्हाडाविरूध्द का केस केली व त्यांचे काय म्हणणे आहे.

या अनुषंगाने विधी सहाय्यक यांनी सांगितले की, गारखेडा येथील सीटी सर्व्हे क्र. १५३०२[भाग], १५३०३[भाग], १५३०६[भाग] ही जमिन संपादनासाठी अधिसुचीत केली आहे व या जमिनीस रोडफेसींग मिळण्यासाठी श्री. बी. एन. कुलकर्णी यांचे प्लॉट सीटी सर्व्हे क्र. १५३०४/३३ संपादनासाठी अधिसुचीत केला आहे. त्यामुळे श्री. कुलकर्णी यांनी म्हाडाविरूध्द न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.

श्री. गायके म्हणाले की, गारखेडा येथील जमिन कोणाची आहे व ती जमिन कोणत्या जमिनीच्या बदल्यात संपादीत केली, तसेच एम. पी. लॉ कॉलेजसमोरील जमिन संपादनातुन वगळतांना कोणत्या अटी व शर्ती ठरल्या होत्या, उर्वरीत भूखंड कोठे आहे याची माहिती सभागृहाला द्या.

श्री. गायके यांनी विचारले की, मंडळाचे प्रकरण न्यायालयात कोण चालवितात. यावर मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा न्यायालयात खाजगी वकील श्री. जोशी काम पाहतात. उच्च न्यायालयातील प्रकरणी सरकारी वकीलांकडे सोपविली जातात.

यावर गायके म्हणाले की, जर सरकारी वकील मंडळाचे प्रकरणी चालवितात तर मग कांही प्रकरणात खाजगी वकील नेमण्याची काय गरज आहे व ते कोणत्या आधारावर खाजगी वकीलाकडे प्रकरण दिले. श्री. एच. टी. जोशी मंडळाची प्रकरणी चालवतात का ? ते कशाचे आधारे अशी विचारणा श्री. गायके यांनी केली.

याविषयावर चर्चा करतांना मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, उच्च न्यायालयात असलेले काही प्रकरणात श्री. एच. टी. जोशी काम पाहतात. प्राधिकरणाने सन १९८३ साली दिलेल्या सुचनेवरून श्री. जोशी यांचेकडे काही प्रकरणी देण्यांत आलेली आहेत.

सर्वसाधारणपणे मंडळाचे प्रकरणी सरकारी वकीलांकडे सोपविण्यांत येतात. काही प्रकरणात सातडीचे, गरजेचे व मंडळाचे नुकसान संभवते अशा प्रकरणात खाजगी वकील प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लावला जातो व प्राधिकरणाने ठरवुन दिलेली फिसच त्यांना देण्यांत येते.

श्री. गायके सदस्य, यांनी प्रलंबीत केसच्या यादीमधील काही केसमध्ये कोणत्या वकीलाकडे आहे याचा तपशील विचारला असता तो तपशील बैठकीमध्ये उपलब्ध नव्हता. त्यावरून श्री. प्रकाश मुगदीया उपसभापती यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या बैठकीसमोर जे विषय चर्चेसाठी येतात त्याची विस्तृत माहिती संबंधीत अधिकाऱ्यांनी ठेवणे अगत्याचे आहे. या सुचनेची नोंद घेऊन पुढील बैठकीत यावे असे त्यांनी सांगितले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ५७७</u>: उक्त विषयाची सविस्तर माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावी.

विषय क्र. ९: मौ. तिसगांव ता. जि. औरंगाबाद येथील गट क्र. १०४/१
या शासकीय जमिनीवरील स्टोन क्रशर्स हटविणेबाबत.

.....

या विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी वाचुन दाखविली व मंडळास माहिती दिली की, तीसगांव येथील स. क्र. १०४/१ या शासकीय जमिनीवरील स्टोन क्रशर हटविण्यासाठी उपविभागीय अधिका-यांना साईटवर घेऊन गेली परंतु निवडणुक कामामुळे अद्याप काही कार्यवाही झालेली नाही.

तसेच स्टोन क्रशरवाल्यांचा लिजपिरियड संपलेला आहे व सध्या अेकच क्रशर चालु असल्याचे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

यावर चर्चा करतांना उपसभापती व इतर सदस्यांनी प्रतिपादन केले की, अप्पर आयुक्त बैठकीस आलेले आहेत त्यांनी या प्रकरणाच्या संदर्भात कार्यवाही करावी.

या अनुषंगाने अप्पर आयुक्तांनी सांगितले की, या विषयी जिल्हाधिका-यांशी चर्चा करुन योग्य कार्यवाही करण्याविषयी कळविती.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७८

स्टोन क्रशर्स हलविण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे पाठपुरावा करण्यांत यावा.

विषय क्र. १०: गेवराई जि. बीड येथील संमिश्र गृहनिर्माण योजना.

या विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५७९

गेवराई येथे विकासीत भूखंडाची योजना राबवावी.

विषय क्र. ११: मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: उच्च उत्पन्न गटांतर्गत नविन औरंगाबाद सिडको येथे बांधलेल्या ८२ गाळयापैकी एक गाळा सेवानिवासस्थानासाठी आरक्षित असलेल्या गाळयांच्या वाटपाबाबत.

या विषयावर चर्चा करतांना श्री. गायके म्हणाले की, ८२ उच्च उत्पन्न गट आविष्कार कॉलनी एन-६ सिडको येथील एक गाळा ९० पासून सेवानिवासस्थानासाठी आरक्षित केलेला होता. या गाळयात सन १९९० पासून कोण राहिले व या गाळयाचा सेवानिवासस्थानासाठी वापर केला नाही तर गाळा वाटप न केल्यामुळे १९९० ते १९९४ पर्यन्त हा गाळा रिक्त आहे व या गाळयाची किंमत रु. १,४८,००० वरुन रु. २,४८,०००/- झाली यास कोण जबाबदार आहे.

उपसभापती श्री. प्रकाश मुगदीया यांनी विचारले की, बाहेरुन येणा-या अधिका-यासाठी सेवानिवासस्थानासाठी गाळा असतांना का वाटप केला नाही, याशिवाय त्या गाळयाचा वापर कशासाठी केला.

मिळकत व्यवस्थापक यांनी खुलासा केला की, या गाळयाचा उपयोग भाडेवसुलीसाठी करण्यांत येत होता.

[illegible]

यावर म. सभापतींनी मत प्रदर्शित केले की, एवढा मोठा गाळा वसुलीसाठी वापरला हे म्हणणे बरोबर नाही. सदर गाळ्याची वाढीव किंमत कोणाकडून वसुल करावयाची अशीही विचारणा केली.

यानंतर श्री. गायके म्हणाले की, रिक्त गाळा वाटपासाठी निदर्शनास आणला नाही यास कोण जबाबदार आहे त्यावर जबाबदारी निश्चीत करावी.

श्री. थोरे यांनी प्रतिपादन केले की, सेवानिवासस्थान असतांना, तेथे न राहता, मंडळाच्या अधिकाऱ्यास मंडळाने भाडे दिले त्यामुळे मंडळाचे नुकसान झाले.

यासंबंधीची माहिती मुख्य अधिकारी यांच्या निदर्शनास आणली नाही ही बाब दुर्दैवी होय, याबाबत मुख्य अधिकारी यांनी संबंधीतांना विचारले पाहिजे होते असे श्रीमती शिरसाठ म्हणाल्या.

श्री. गायके यांनी सांगितले की, याच कॉलनीत एक गाळा भ. जमातीसाठी आरक्षित होता व त्याचे वाटप अद्याप झालेले नव्हते ही बाब मी निदर्शनास आणल्यानंतर जाहिरात देऊन वाटप करण्यांत येत आहे.

मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, श्री. गायके यांनी निदर्शनास आणल्यानंतर गाळा वाटपाची कार्यवाही त्वरीत चालु केली.

मंडळाच्या सदस्यांनी गाळा रिक्त असल्याबाबतची माहिती दिल्यानंतर गाळा वाटपासाठी जाहिरात द्यावयास नको होती व सदरची बाब मंडळाच्या निदर्शनास आणावयास पाहिजे होते असे श्रीमती शिरसाठ म्हणाल्या.

त्यावर, ही नित्याची बाब होती, धोरणात्मक निर्णयासारखी त्यात काही नव्हते. त्यामुळे ही जाहिरात देऊन कार्यवाही करण्यांत आली असल्याचे मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, ४ ते ५ वर्षापासून ही दोन गाळे रिक्त आहेत. त्यामुळे गाळ्यांची किंमत वाढली व पर्यायाने लोकांचे नुकसान झाले. यास जे जबाबदार असतील त्यावर कार्यवाही करण्यांत यावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५८०

८२ गाळे उच्च उत्पन्न गट एन-६ या योजनेतील, ठराव क्र. २७३ नुसार वर्ग-१ च्या अधिकाऱ्यासाठी आरक्षित केलेला गाळा सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुला करण्यांत येत आहे व हा गाळा वर्ग १ अधिकाऱ्यासाठी असतांना सन १९९० पासून ते आतापर्यन्त का वाटप करण्यांत आला नाही यांची चौकशी करून मंडळाच्या पुढील बैठकीसमोर अहवाल ठेवण्यांत यावा.

विषय क्र. २: आर-२८ सिडको येथील १२ उच्च व ६ मध्यम उत्पन्न गट योजनेस बांधकाम मंजूरी मिळणेबाबत.

या विषयाची तयार करण्यांत आलेली बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

आर-२८ सिडको येथील क्षेत्र १.५५७ हे. ही जमिन मंडळाने सिडकोकडून ताब्यात घेतली. ही जमिन ताब्यात घेतांना सिडकोने मंडळास ॲग्रीमेंट टु लिज केले होते. मंडळाने या जमिनीवर ७२ उच्च उत्पन्न गट गाळे व २ भूखंड अशी योजना तयार केली होती. पैकी ७२ उच्च उत्पन्न गट गाळ्याचे बांधकाम सन ९२-९३ मध्ये पुर्ण केले व या गाळ्याचे वाटप झालेले आहे. उर्वरीत दोन भूखंडावर १२ उच्च व ६ मध्यम उत्पन्न गट गाळ्यांची योजना तयार करून प्रकरण बांधकाम

परवानगीसाठी सिडकोकडे दाखल केले. सिडकोने त्यावर कळविले की, अॅग्रीमेंट टु लिजच्या तरतुदीनुसार विहीत मुदतीत बांधकाम न केल्यामुळे अतिरिक्त भाडे पट्टा भरावा लागेल असे कळविले.

त्यावर मंडळाने ७२ उच्च उत्पन्न गट योजनेचे बांधकाम पुर्ण केले म्हणून अतिरिक्त भाडेपट्टा लावु नये अशी विनंती केली. या प्रकरणात सिडकोशी बराच पत्रव्यवहार केल्यानंतर सिडकोने पुन्हा प्रकरणाचा फेरविचार करुन रु. ४६,७१०/- इतकी रक्कम अतिरिक्त भाडेपट्टयापोटी भरल्याशिवाय परवानगी मिळणार नाही असे अंतिम उत्तर दिले.

आता ही रक्कम जर भरली नाही तर बांधकाम परवानगी मिळणार नाही. मात्र अशा एका प्रकरणात आर-२६, आर-२७ या जमिनीवर अतिरिक्त भाडेपट्टा भरल्यामुळे लेखापरिक्षणाच्या वेळी आक्षेप घेण्यांत आला आहे व तो आतापर्यन्त बंद करण्यांत आलेला नाही.

मुख्याधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, एकीकडे अतिरिक्त भाडेपट्टा न भरल्यास बांधकाम परवानगी मिळत नाही व दुसरीकडे अतिरिक्त भाडेपट्टयाची रक्कम भरल्यास लेखा परिक्षणाचे आक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा परिस्थितीत काय कार्यवाही करावी याबाबत मंडळाकडून मार्गदर्शन व्हावे अशी विनंती केली.

या प्रकरणात सांगोपांग चर्चा झाली. अतिरिक्त भाडेपट्टा न भरल्यामुळे वेळेचा अपव्यय होत आहे. कालांतराने गाळ्यांच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होईल शिवाय त्वरीत योजना कार्यान्वीत न झाल्यास या जमिनीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे मत मंडळाच्या सदस्यांनी व्यक्त केले. अतिरिक्त भाडेपट्टयाची रक्कम भरल्यानंतर त्यांचा अंतर्भाव विक्री किंमतीत करण्यांत येईल त्यामुळे मंडळाचे नुकसानीचा प्रश्न उद्भवणार नाही. म्हणून सिडकोने मागितलेली अतिरिक्त भाडेपट्टा भरून बांधकाम त्वरीत हाती घेण्यांत यावा कारण या परिसरात प्राधिकरणाच्या घरांना चांगली मागणी आहे असे विदुन येते असे सर्वानुमते ठरले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५८१

आर-२८ सिडको येथील १२ उच्च व ६ मध्यम उत्पन्न गट गाळ्यांच्या योजनेसाठी सिडकोने कळविलेली रक्कम रु. ४६,७१०/- इतकी रक्कम अतिरिक्त भाडेपट्टा भरण्यांत यावा व योजनेचे बांधकाम त्वरीत हाती घेण्यांत यावे.

विषय क्र. ३: जाहिरात प्रसारीत करण्याच्या पध्दतीबाबत.

या विषयावर तयार करण्यांत आलेली बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. मंडळाच्या ज्या जाहीराती जातात त्या प्रामुख्याने औरंगाबाद परिसरात कार्यरत असलेल्या ४ मोठ्या दैनिकापैकी रोटेशनप्रमाणे एकाला देण्यांत येते व ज्या भागातील जाहिरात असेल त्या भागातील एका स्थानिक दैनिकास देण्यांत येते असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

त्यावर मागील सहा महिन्यात किती जाहिरात कोणत्या दैनिकाला देण्यांत आल्या याबाबतची माहिती श्री. गायके यांनी विचारली.

सदर माहिती उपलब्ध झाल्याने पुढील बैठकीत ठेवण्यांत येईल असे

मा. सभापतींनी असे आदेश दिलेत की, सदर माहिती पुढील बैठकीत न चुकता ठेवावी.

मंडळाचे सदस्य श्री. गायके यांनी कशाच्या आधारे वरील प्रमाणे जाहिरात देण्यात येतात असे विचारले.

त्यावर मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, प्राधिकरणाकडील वेळोवेळी प्राप्त झालेले आदेश, स्थानिक परिस्थिती गृहीत धरून वरीलप्रमाणे जाहिरात देण्याची पध्दत अवलंबिण्यात येते. तथापी मंडळास याबाबत धोरणात्मक बदल करावयाचा असल्यास करावा म्हणजे त्याप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची तजवीज केली जाईल असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

मंडळाचे सदस्य श्री. गायके यांनी मुद्दा उपस्थित केला की, एका गाळ्यासाठी जर मंडळाने जाहिरात दिली तरी फार मोठी लांबलचक असते. तसेच आलेल्या अर्जाची सोडत काढतांना कमी अर्ज असतांना सुध्दा वेळ व ठिकाण निश्चीतीबाबत वृत्तपत्रात जाहिरात दिली जाते त्यामुळे मंडळाचा पैसा फुकट जातो. २५ पेक्षा कमी अर्ज असल्यास सोडती संबंधी जाहिरात न देता जर प्रत्येक अर्जदाराला सोडतीची तारीख व वेळ पत्राने कळविली तर ते सोयीस्कर होईल असे श्री. गायके यांनी प्रतिपादन केले. त्यावर मुख्याधिकारी यांनी, सदरचा प्रस्ताव एकदम चांगला आहे व तो स्वीकारण्यास हरकत नाही असे सांगितले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५८२

मंडळातर्फे देण्यांत आलेल्या मागील ६ महिन्याच्या जाहिराती कोणत्या पेपरला देण्यांत आल्या त्याची माहिती पुढील बैठकीसमोर ठेवण्यांत यावी व २५ पेक्षा कमी अर्ज असल्यास सोडतीची तारीख व वेळ निश्चीत करणारी जाहिरात न देता अर्जदारांना वैयक्तीक पत्राने कळविण्यांत यावे.

विषय क्र. ४: मौजे तिसगांव औरंगाबाद येथील गट क्र. १०४/१ वरील गृहनिर्माण योजना.

...

याबाबतची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

वाळुज परिसरात १८ गांवाचा नियोजनबध्द विकास करण्यासाठी शासनाने प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केलेले होते. कालांतराने म्हाडाकडून विशेष नियोजन प्राधिकरणाचे काम काढून घेण्यांत आले व सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली. तीसगांव येथील गट क्र. १०४/१ क्षेत्र १०.३१ हे. ही शासकीय जमिन सन १९८९मध्ये मंडळाने ताब्यात घेतली. या जमिनीवर ४८ उच्च उत्पन्न गट, १४४ मध्यम उत्पन्न गट, ५४० अल्प उत्पन्न गट अशी योजना तयार केली या जमिनीवर काही ठिकाणी स्टोन क्रशर्स असल्यामुळे क्रशर्स खालील जमिन वगळुन जिल्हाधिकारी यांनी ताबा दिला.

ताब्यात असलेल्या जमिनीवर २४ उच्च उत्पन्न गट गाळ्यांचे बांधकाम सुरु करुन पुर्णत्वास आलेले आहे. गट नं. १०४/१ जमिनीवरील स्टोन क्रशर्स हटविणेबाबत वेळोवेळी मंडळातर्फे जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्यांत आला तथापी अद्यापपर्यन्त स्टोन क्रशर्सउठविलेली नाही. स्टोन क्रशर्सचा लिज निर्णय घेतला आहे व जिल्हाधिकारी यांचेकडून उठविले जातील हे गृहीत

धरून मंडळाने १९९२ साली सिडकोकडे रु. १, १०, ७१, ११०/- विकास भारापोटी भरून लेआऊट मंजूर करून घेतला. लेआऊट मंजूर करून घेतला त्यावेळी एका वर्षाच्या कालावधीत या योजनेस पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला जाईल असे त्यांचेकडील पत्र दि. ३.८.९३ अन्वये कळविले. हा कालावधी संपल्यानंतर पुन्हा सिडकोकडे पाणीपुरवठा मिळण्याबाबत पाठपुरावा केला असता सिडकोकडील २०.७.९४ च्या पत्रानुसार असे कळविले की, अंदाजे माहे डिसें. ९६ अखेर पाणीपुरवठा करणे शक्य होईल.

सिडकोची त्या भागातील इतर कामाची प्रगती पाहता व मागील अनुभव पाहता सिडकोने कळविलेल्या कालावधीमध्ये पाणीपुरवठा होईल किंवा नाही हे सांगता येणार नाही. बराच पाठपुरावा करूनही स्टोन क्रशर्स जिल्हाधिकारी यांचेकडून अद्याप हटविण्यात आलेले नाही अशा परिस्थितीत ही योजना कार्यान्वीत करणे अवघड आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

सिडकोकडे भरलेल्या विकास भाराची रक्कम बरीच मोठी असल्यामुळे ती त्यांनी परत करणे विषयी विनंती केली असता त्यांनी पुर्ण झालेल्या २४ गाळे उच्च उत्पन्न गट योजने पुरताच सुधारीत आराखडा सादर करावा असे सुचविले व त्या आराखड्याखालील जमिनीच्या प्रमाणात भरलेली विकास भाराची रक्कम ठेऊन बाकीची विकास भाराची रक्कम परत करण्यांत येईल असे त्यांनी कळविले आहे. त्यामुळे सुधारीत आराखडा सिडकोकडे सादर करून विकास भाराची रक्कम परत घेण्यांत यावी असे मुख्याधिकारी यांनी सांगितले. भविष्यात जेंव्हा योजना घेण्यासारखी परिस्थिती होईल त्यावेळी पुन्हा विकास भार भरून परवानगी घेण्यांत येईल.

या विषयावर मंडळाच्या सदस्यांनी सविस्तर चर्चा केली व सिडकोकडे भरलेली विकास भाराची रक्कम परत घेण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले व खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्र. ५८३

तोसगांव गट नं. १०४/१ वरील योजनेसाठी सिडकोने मंजूर केलेल्या आराखड्यातील, २४ उच्च उत्पन्न गट योजनेपुरताच सुधारीत आराखडा मंजूरीसाठी सादर करण्यांत यावे व तेवढ्या जागेचा विकास भाराची रक्कम वगळून उर्वरीत रक्कम परत करण्याची विनंती सिडकोस करण्यांत यावी.

विषय क्र. ५: सिडको आर-२६ व आर-२७ वरील अल्प उत्पन्न गटांतर्गत गाळ्यांच्या किंमतीत झालेले बदल लाभधारकास कळविणेबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

२१९ अल्प उत्पन्न गट, ११२ अल्प उत्पन्न गट, २१२ अल्प उत्पन्न गट या तीन योजनेची अनुक्रमे रु. ५६,०००, ५७,००० , ५६,०००/- अशी किंमत जाहिरातीमध्ये दर्शविलेली होती. आता सदरच्या तिन्ही योजनेचे बांधकाम पुर्णत्वास आले आहे व गाळे थोड्या अवधीत ताब्यात द्यावे लागणार आहे. या गाळ्याच्या बांधकामासाठी लागलेल्या प्रत्यक्ष खर्चावर सुधारीत विक्री किंमत काढण्यांत आलेली आहे ती अनुक्रमे २१९ गाळ्यासाठी रु. ७४,०००/- , ११२ गाळ्यासाठी ७८,०००/- व २१२ गाळ्यांची रु. ७९,०००/- अशी किंमत निघाली आहे.

जाहिरात देते वेळी दाखविलेली किंमत ही त्यावेळी अस्तीत्वात असलेल्या दरसुचीवर आधारीत होती. त्यानंतर दरसुचीमध्ये वाढ झाल्यामुळे तसेच सिडकोतर्फे जमिनीवर लावण्यांत आलेला अतिरिक्त भाडेपट्टा, न्युडल चार्जेस भरावे लागल्यामुळे, म. रा. वि. मं. तर्फे विद्युतीकरणापोटी कळविलेल्या अंदाजपत्रकानुसार फार मोठी वाढ झाल्यामुळे या किंमती वाढल्या असे मुख्याधिकारी यांनी सांगितले व सदरची किंमत मान्य करून लाभधारकांना कळविण्यांत यावे असे प्रतिपादन केले.

या विषयावर सविस्तर चर्चा मंडळाच्या सदस्यांनी केली व वाढ झालेली व प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे त्यामुळे मान्य करण्यास हरकत नाही असे सांगितले व खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्र. ५८४

आर-२६, आर-२७ वरील अल्प उत्पन्न गट गाळ्यांच्या किंमती खालील प्रमाणे वाढल्या त्यास मंडळाने मान्यता दिली. सदरच्या किंमती लाभधारकांना कळविण्यांत याव्यात.

अ. क्र.	योजना	वाढीव किंमत
१.	२१९ अल्प उत्पन्न गट	७४,०००/-
२.	११२ अल्प उत्पन्न गट	७८,०००/-
३.	२१२ अल्प उत्पन्न गट	७९,०००/-

...

पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे सदस्य श्री. विश्वनाथ थोरे, श्रीमती पार्वतीबाई शिरसाठ, श्री. गायके यांनी मंडळाच्या सदस्यांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष द्यावा अशी मागणी केली. त्यावर मा. सभापतींनी सांगितले की, असा कक्ष उपलब्ध आहे का त्याचा तपास करावा.

मंडळाचे उपसभापती श्री. प्रकाश मुगदीया यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या बैठकीसाठी लागणारे आवश्यक ते फर्निचर घेणे गरजेचे आहे.

त्यावर मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, कसलेही फर्निचर खरेदी करावयाचे नाही असे प्राधिकरणाचे आदेश आहे. त्यामुळे नविन फर्निचर खरेदी करणे अवघड आहे.

त्यावर उपसभापती यांनी प्रतिपादन केले की, सदरचे आदेश हे मंडळ अस्तीत्वात येण्यापुर्वीचे आहेत. त्यावेळी मंडळाचे सदस्य कमी होते. आता नविन परिस्थितीमध्ये मंडळाच्या सदस्यांची संख्या लक्षात घेता बैठकीसाठी लागणारे फर्निचर घेणे अगत्याचे आहे ते घेण्यांत यावे व फर्निचर खरेदीवर घातलेली बंदी शिथील करण्यासाठी प्राधिकरणास विनंती करण्यांत यावी.

मा. सभापती, उपसभापती यांनी सूचना केली की, मंडळाचे अर्ज विक्रीसाठी स्वतंत्र काऊंटर उघडण्यात यावे व तक्रारपेटी ठेवण्यांत यावी. या सूचनांची अंमलबजावणी त्वरीत करण्यांत येईल असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

माहे ऑगष्ट, सप्टेंबर ९४ मध्ये विशेष वसूली मोहीम राबविली व या दोन महिन्यात जवळ जवळ १ कोटी रु. थकबाकी वसूल केली असे मुख्याधिकारी यांनी मंडळाच्या निदर्शनास आणून दिले व ही बाब माहितीसाठी मंडळाच्या समोर ठेवत आहे असे सांगितले.

तसेच माहे सप्टेंबर, ऑक्टोंबरमध्ये प्लेगसदृश्य परिस्थितीमध्ये मंडळाच्या वसाहतीत तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्यांत आली व सर्व वसाहतीमध्ये गवत कापणी, कचरा साफ करणी, किटकनाशक औषधांची फवारणी अशी कामे करण्यांत आली असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

ही दोन्ही कामे अभिनंदनास पात्र आहे असे मंडळाच्या सदस्या श्रीमती पार्वतीबाई शिरसाठ म्हणाल्या.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभारम्हणून मा. सभापती यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

....